**फौ.की.अर्ज. ४४/२०२५**
शोभा वि. हुजार

**भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ कलम २२३ (१) अन्वये फिर्यादीचा शपथेवर जबाब**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | |
|---|---|
| माझे नाव | :. **शोभा सुरेश थोरात** |
| माझे वय | :. ५५ वर्षे |
| व्यवसाय | :. **शेती** |
| राहणार | :. चांडोली बु, ता.आंबेगाव जि.पुणे. |

दि.०३/१०/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता माझा दिर सुनिल धुला थोरात हा आमच्या घराच्या पाठीमागे ट्रॅक्टर घेवुन आला होता. मी सुनिल थोरात यास म्हणाले की, आपले सामायीक खाते आहे, तुम्ही तुमच्या वाटयाची जमिन नांगरा. त्यावेळी तो मला म्हणाला की, मी नांगरणारच आहे तुला काय करायचे ते कर असे म्हणुन मला जिवे मारण्याची धमकी दिली. मी ट्रॅक्टरला आडवी गेले असता त्याने माझ्या अंगावर ट्रॅक्टर घालण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे मी बाजुला झाले. त्यानंतर सुनिल थोरात याने ट्रॅक्टरवरुन पळत येवुन माझ्या कानाखाली मारली. माझे सासरे हुजार बालाजी थोरात यांनी माझ गळा दाबुन मला खाली पाडले. त्यानंतर सुनिल थोरात, हुजार बालाजी थोरात, सार्थक सुनिल थोरात, भारती सुनिल थोरात व जिजाबाई थोरात या सर्वांनी मला लाथाबुक्यांनी मारहाण केली. आरडाओरडा ऐकुन माझे पती तेथे आले व त्यांनी मला सोडवले. त्यानंतर आम्ही पोलीस ठाण्यात तक्रार केली. परंतु, पोलीसांनी कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळे मी न्यायालयात प्रस्तुत खटला दाखल केला आहे. आरोपींना शिक्षा व्हावी अशी माझी विनंती आहे. वरील सर्व मजकुर मी वाचला व तो खरा व बरोबर आहे.

साक्षीदाराची सही

S.S.T.

समक्ष

SANTOSH LAXMAN VAIDYA

Digitally signed by SANTOSH LAXMAN VAIDYA
Date: 2026.01.21 15:10:41 +0530

(संतोष लक्ष्मण वैद्य)
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग**
**घोडेगाव जि.पुणे**

**घोडेगाव.**
**दिनांक:**. २१/०१/२०२६